Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांची राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्ता एक सहसंबंधात्मक अभ्यास

प्रा. उज्वला स. नवले
मारिया अध्यापक महाविद्यालय तुकूम,
चंद्रपूर

**प्रस्तावना :**

मानवी शक्तीच्या विकासात शिक्षणाचा सिंहाचा वाटा आहे. भूतकाळाने व वर्तमानकाळाने जे चांगले दिले आहे त्यावर प्रचलित शिक्षण पद्धती आधारित आहे. जर शिक्षणाचे व्यवस्थित नियोजन करण्यात आले तर सर्वांगिण विकासाचे फायदे सर्व लोकांपर्यंत पोहचविणे शक्य होईल. शिक्षण क्षेत्रात योग्य तो बदल झाल्यास त्याचा फायदा समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचेल आणि सर्वांनाच आपल्या प्रगतीची जाणिव होईल. या शतकात विविध आव्हाने आणि संधी उपलब्ध होत आहेत. नवीन पीढी सतत नवनवीन विचार करणारी, सृजनात्मक विचारशैलीचा उपयोग करण्याची क्षमता असणारी अशी असली पाहिजे. त्याची प्रत्येक कृती, मानवी मूल्ये व सामाजिक न्याय यंत्रणेशी बांधीलकी दर्शविणारी अशी असावी. दर्जेदार शिक्षणातून ही तत्वे संपादन करता येतील. शिक्षण ही भविष्यकाळासाठी वर्तमानकाळातील अद्वितीय अशी गुंतवणुक आहे.भारतासारख्या विशाल देशात अनेक धर्म, पंथ, जाती, वंशाचे लोक राहतात. त्यांच्यात परस्परामध्ये सलोख्याची, बंधुत्वाची, आपुलकीची भावना असणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे? त्या भावनेवरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे. म्हणुन कोठारी आयोगानेही ''राष्ट्रीय भावात्मता'' हे शिक्षणाचे उद्दिष्ट सांगितले आहे. अलीकडील काही घटनांचा विचार केल्यास सामाजिक स्वास्थासाठी राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणे ही महत्वाची गरज आहे असे दिसून येते.

प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी राष्ट्र विषयक निष्ठांना समूहनिष्ठांपेक्षा श्रेष्ठ मानण्यास, राष्ट्र कल्याणास समूहहितांपेक्षा श्रेष्ठ समजण्यास, उत्तेजन देणा–या मनोवृत्तीचा सामाजिक व्यक्तिमत्वाच्या भावनेशी सुसंवादी मेळ घालण्यास शिकविणे म्हणजे भावनिक एकात्मता साधणे होय.सामाजिक जिवन सुव्यवस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांचे सामाजिकरण होणे तसेच राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणे आवश्यक आहे. व्यक्तींची मने जोडणारी प्रक्रिया म्हणजे एकात्मता होय. व्यक्ती जेव्हा इतरांच्या सुख दुःखाशी समरस होतात, तेव्हा त्याला राष्ट्रस्वरूप प्राप्त होते. आपण सर्वजण एक आहेत असे आपणांस वाटू लागते.

डॉ. श्रीमती सरोजिनी रेगानी यांच्या मते – "राष्ट्रीय एकात्मता म्हणजे लोकमानसात दृढ ऐक्यभावनेचा विकास करणे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते – "मी माझ्या देशाशी कधीही द्रोह करणार नाही याची दक्षता घेणे म्हणजेच राष्ट्रीय एकात्मता होय."

राष्ट्रीय एकात्मता ही जन्मजात नसते, ती तयार करावी लागते. राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सामाजिक बुद्धिमतेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे विद्यार्थ्यांची सामाजिक बुद्धिमत्ता किती प्रगल्भ आहे. यावर त्यांच्या राष्ट्रीय एकात्मतेचा विकास अवलंबून असतो. ई. एल. थॉर्नडादक यांच्या मते – '' सामाजिक बुद्धिमत्ता क्षमता म्हणजे पुरूष आणि स्त्रिया, मुले आणि मुली यातील मानवी परस्पर संबंध अचूकपणे उमजणे व ते सुरळीत राखणे होय." विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सामाजिक बुद्धिमत्तेचा विकास करणे महत्वाचे आहे. कारण ती एक काळाची गरज आहे. परस्परामध्ये प्रेम, जिव्हाळा, आत्मियता राहणे गरजेचे आहे. फोफावणा–या आतंकवादाला आळा घालण्याकरिता आज सामाजिक साक्षरतेची आणि सामाजिक विकासाची गरज आहे. तयार होणा–या शिक्षकांमध्ये समाजाबद्दल, राष्ट्राबद्दल आदराची भावना निर्माण करण्यासाठी अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांना त्या पद्धतीची शिकवण देणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता ही सारखी नसते त्यामुळे त्यांची शैक्षणिक, सामाजिक आणि भावनीक विकासाचा विचार करणे महत्वाचे आहे. राष्ट्रीय चारित्र्य निर्मितीचे कार्य शिक्षकांनाच करायचे आहे. राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी त्याप्रकारची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची सामाजिक बुद्धिमत्ता विकसित करून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे गरजेचे आहे. म्हणजेच राष्ट्रीय एकात्मतेत विकास साधत असतांना सामाजिक बुद्धिमत्ता तयार करावी लागते. याकडे शिक्षकांना विशेष लक्ष द्यावे लागेल. म्हणूनच शिक्षण प्रशिक्षण घेतांना छात्राध्यापकांमध्ये सामाजिक बुद्धिमत्तेचा विकास करून राष्ट्रीय एकात्मतेची जाण

निर्माण करणे गरजेचं आहे. तेव्हाच भावी पिढी असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल.म्हणून संशोधिकेने सदर समस्या संशोधनासाठी निवडली आहे.

**संशोधनाची गरज आणि महत्व:**

कोणत्याही देशाचे भवितव्य सुसंस्कृत व जागरूक नागरिकाशिवाय यशस्वी होणे शक्य नाही. आजच्या शिक्षण पद्धतीने केवळ शिक्षित नागरिक निर्माण करून चालणार नाही तर आजच्या भारताच्या लोकशाहीस राष्ट्रभिमान, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकात्मतेची भावना सतत जागरूक ठेवणारा नागरिक निर्माण करणे आवश्यक आहे. ही भावना सतत ठेवण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे. व्यक्तीचे वर्तन, कला, वाड्मय, रूढी, परंपरा इत्यादीतून समाजाच्या एकात्म संस्कृतीचे दर्शन घडते. सामुदायिक संस्कृतीची कल्पना हा राष्ट्रीय एकात्मतेचा पाया आहे. अशा एकात्मतेतच राष्ट्राचे सामर्थ्य असते. या सर्वांबद्दल विद्यार्थ्यांना स्पष्ट कल्पना शालेय जीवनात यावयास पाहिजे. अध्यापक महाविद्यालयात शिक्षण घेणारे छात्राध्यापक पुढील पीढीचे मार्गदर्शक ठरणार आहे. म्हणून त्यांच्यात सेवापूर्ण प्रशिक्षण दरम्यान राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे गरजेचे आहे व त्यासाठी त्यांच्यात असलेल्या सामाजिक बुद्धिमत्तेचा अभ्यास करून ती विकसित करण्याची गरज आहे. कारण सामाजिक विकासावर राष्ट्राची प्रगती अवलंबून आहे. याची जाण शिक्षकांमध्ये सुरूवाती पासूनच निर्माण करणे गरजेचे आहे तेव्हाच ते पुढील पिढीला राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व पटवून देवून त्या दिशेने कार्य करतील कारण शिक्षक हा भावी पिढीचा आधारस्तंभ मानल्या जातो.

सुशिक्षित होणारा विद्यार्थी सुसंस्कृत होईल ही आजच्या काळाची गरज आहे. म्हणूनच उद्याचा नागरिक घडविणारा शिक्षक राष्ट्रभक्तीने, राष्ट्रप्रेमाने ओथंबलेला असावा. त्याकरीता शिक्षकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, मूल्य किती प्रमाणात त्यांच्या ठिकाणी आहे, सामाजिक बुद्धिमत्ता किती विकसित झाली आहे याचा अभ्यास करण्याची गरज वाटली. तसेच त्यांच्या ठिकाणी राष्ट्रीय एकात्मतेसाठी सामाजिक बुद्धिमत्तेचा खरोखरच वाटा आहे का? इतरांना आपली मते पटवून देण्याचे कसब किती छात्राध्यापकांमध्ये आहे? प्रत्येक गोष्टीचे ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा किती आहे? राष्ट्रविषयीच्या त्यांच्या निष्ठा कशा आहेत? परिस्थितीशी समायोजन साधण्याची दृष्टी किती प्रमाणात आहे? इ. अनेक प्रश्नांचा शोध घेणे आवश्यक आहे.

लोकशाही कल्याणकारी राज्यात अभिप्रेत असलेली किमान आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक समानता प्रस्थापीत करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मताचे अध्ययन २१ व्या शतकात अतिशय आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्ता यांचा एकत्रित अभ्यास करणे गरजेचे आहे. छात्राध्यापकांच्या राष्ट्रीय एकात्मतेत व सामाजिक बुद्धिमत्तेचा सहसंबंध व सामाजिक बुद्धिमत्तेचा शोध घेण्याच्या दृष्टिने संशोधिकेला अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांच्या एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्ता यांचा सहसंबंधात्मक अभ्यास करण्याची आवश्यकता वाटली. त्यासाठी ही समस्या संशोधन करण्यासाठी संशोधिकेने निवडली.

**समस्या विधान:**

“चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांची राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्ता एक सहसंबंधात्मक अभ्यास.”

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१.चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या राष्ट्रीय एकात्मतेचा अभ्यास करणे.
२. चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या सामाजिक बुद्धिमत्तेचा अभ्यास करणे.
३. चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्‌यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्तेचा सहसंबंधात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाच्या परिकल्पना (शून्य परिकल्पना):**

१. चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्‌यालयातील छात्राध्यापकांची राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्तेतील सहसंबंध सार्थक नाही.
२. चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्‌यालयातील छात्राध्यापिकांच्या राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्तेतील सहसंबंध सार्थक नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन हे चंद्रपूर जिल्हयातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिका मधील राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्ता या घटकांपुरतेच मर्यादित आहे.

**न्यादर्श:**

प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर जिल्हयातील विविध अध्यापक महाविद्यालयापैकी तीन महाविद्यालयातील १२० प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक यांची असंभाव्यता पद्धतीतील सप्रयोजन पद्धतीनुसार न्यादर्श म्हणून निवड केली.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनाच्या विषयाचे स्वरूप लक्षात घेता सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. या संशोधन पद्धतीचा वापर करताना छात्राध्यापकांची राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक

बुद्धिमत्तेचे वर्तमानस्थिती कळावी म्हणून चाचण्यांच्या आधारे मापन करून एकूण वर्तमानस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची साधने:**

शैक्षणिक संशोधनामध्ये विश्वासार्ह, वैध, गुणात्मक व परिमाणात्मक संशोधन आधार सामुग्रीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करून संशोधनाचे निष्कर्ष काढावे लागतात. संशोधनाचे निष्कर्ष अचूक यावेत म्हणून साधनांची निवड करताना प्रमाणित मानसशास्त्रीय चाचण्यांची निवड केली आहे.

१. डॉ. हसीन ताज – राष्ट्रीय एकात्मता अभिवृत्ती मापिनी.

२. डॉ. एन. के. चड्डा,उषा गणेशन – सामाजिक बुद्धिमत्ता चाचणी. या प्रकारच्या प्रमाणित चाचण्या वापरल्या असून एकूण ३५ व ५३ प्रमाणे विधनांचा समावेश केलेला आहे.

**सांख्यिकीय साधने:**

न्यादर्शातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांकडून प्राप्त झालेल्या आधारभूत माहितीच्या विश्लेषणाकरिता मध्यमान, प्रमाण विचलन, सहसंबंध गुणक या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग करण्यात आला.

छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या राष्ट्रीय एकात्मतेचा व सामाजिक बुद्धिमत्तेच्या माहितीचे विश्लेषण

| | **छात्राध्यापक ६०** | **छात्राध्यापिका ६०** |
|---|---|---|
| **प्रकार** | राष्ट्रीय एकात्मता सामाजिक बुद्धिमत्ता | राष्ट्रीय एकात्मता सामाजिक बुद्धिमत्ता |
| **घटक** | १४२१ ६७८५ | १२९८ ६७८२ |
| **मध्यमान** | २३.६८ ११३.०८३ | २१.६३ ११३.०३३ |

छात्राध्यापकांच्या राष्ट्रीय एकात्मतेचा व सामाजिक बुद्धिमत्तेचा सहसंबंध

| अ. क्र. | घटक | एकूण | सरासरी | प्रमाण विचलन | 'r' | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्ता | १४२१ ६७८५ | २३.६८ ११३.०८ | ४.७४ ८.९० | ०.२९८४ | सार्थक |

**विश्लेषण :**

छात्राध्यापकांची राष्ट्रीय एकात्मतेचा व सामाजिक बुद्धिमत्तेचा सहसंबंध अभ्यासला असता प्राप्त मूल्य 'r'= ०.२९८४ आढळले. हा सहसंबंध धनात्मक स्वरूपाचा व निम्न प्रतीचा आहे. सहसंबंधाची स्वाधीनता मात्रा ५८ असताना ०.०५ स्तरावर आवश्यक मूल्य ०.२५ व ०.०१ स्तरावर आवश्यक मूल्य ०.३२५ आहे. प्राप्त मूल्य हे आवश्यक मूल्यापेक्षा जास्त असल्यामुळे छात्राध्यापकांच्या राष्ट्रीय एकात्मतेचा व सामाजिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंध ०.०५या स्तरावर सार्थक आहे. म्हणून परिकल्पना क्रमांक ०१ चा त्याग करण्यात आला.

**छात्राध्यापिकांच्या राष्ट्रीय एकात्मतेचा व सामाजिक बुद्धिमत्तेचा सहसंबंध**

| अ. क्र. | घटक | एकूण | सरासरी | प्रमाण विचलन | 'r' | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बुद्धिमत्ता | १२९८ ६७८२ | २१.६३ ११३.०३३ | ३.७७ ७.३६ | ०.१९५ | असार्थक |

**विश्लेषण :**

छात्राध्यापिकांची राष्ट्रीय एकात्मतेचा व सामाजिक बुद्धिमत्तेचा सहसंबंध अभ्यासला असता प्राप्त मूल्य 'r'= ०.१९५ आढळले. हा सहसंबंध धनात्मक स्वरूपाचा व अति निम्न प्रतीचा आहे. सहसंबंधाची स्वाधीनता मात्रा ५८ असताना ०.०५ स्तरावर आवश्यक मूल्य ०.२५ व ०.०१ स्तरावर आवश्यक मूल्य ०.३२५ आहे. प्राप्त मूल्य हे आवश्यक मूल्यापेक्षा कमी असल्यामुळे छात्राध्यापकांच्या राष्ट्रीय एकात्मतेचा व सामाजिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंध दोन्ही स्तरावर सार्थक नाही. म्हणून परिकल्पना क्रमांक ०२ चा स्वीकार करण्यात आला.

**निष्कर्ष:**

१. अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्याापिकांपेक्षा छात्राध्यापकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता अभिवृत्ती जास्त रूजलेली आढळली.

२. छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची सामाजिक बुद्धिमत्ता सरासरी सारखी आढळली.

३. छात्राध्यापकांच्या राष्ट्रीय एकात्मता अभिवृत्ती व सामाजिक बुद्धिमत्तेचा धनात्मक परंतु कमी प्रतीचा सार्थक सहसंबंध आढळून आला.

४. छात्राध्यापिकांच्या राष्ट्रीय एकात्मता अभिवृत्ती व सामाजिक बुद्धिमत्तेचा धनात्मक व अत्यंत कमी प्रतीचा सहसंबंध आढळून आला.

**शिफारशी :**

१. समाजातील सर्व घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देशाची उन्नती व प्रगती होण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता अभिवृत्ती रूजणे आवश्यक असल्यामुळे त्याकरीता सर्व माध्यामांचा उपयोग व्हावा. याकरीता सामाजिक जागृती आवश्यक आहे.

२. देशाचा विभिन्न अंगाचा परिचय सर्व विद्यार्थ्यांना करून द्यावा व स्वातंत्र प्राप्तीस कारणीभूत ठरलेल्या घटनांची माहिती द्यावी.

३. विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा राष्ट्रीय एकात्मतेचा दृष्टीकोन व्यापक होईल अशा त—हेचे ज्ञान आणि माहिती अभ्यासक्रमात असावी.

४. राष्ट्रीय चारित्र्य निर्मितीसाठी विद्यार्थ्यांच्या सवयी व स्वभाव सुधारून सामाजिक बुद्धिमत्ता वाढवावी.

५.विद्यार्थ्यांत सामाजिक विकासासाठी लागणारी बुद्धिमत्ता निर्माण करण्यासाठी त्यांच्या मन:शक्तीवर चांगले संस्कार केले पाहिजे.

६. शासनाने एकात्मतेसाठी योजना आखून त्यात युवा पिढीचा समावेश करून घ्यावा.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. अहेर, हिरा ; १९९५ उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन, नागपूर

२. आगलावे, प्रदिप ; २००१ संशोधन पद्धती व तंत्रे नागपूर, विद्या प्रकाशन

३. आंबेकर; १९९७ मूल्यशिक्षण शिक्षण हस्तपुस्तिका पुणे, अमेय प्रकाशन, सदाशिव पेठ

४. कुलकर्णी के.वी ; १९८५ प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, श्री विद्या प्रकाशन

५. घोरमोडे, के.यु. ; २००८ शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, पुणे, श्री विद्या प्रकाशन

६. जगताप ह.ना. ; १९८८ शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे, नूतन प्रकाशन

७. भितांडे वि.रा. ; १९८९ शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन

८. भांडारकर, के.एम. १९८७ सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नागपूर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ